कला व वाणिज्य महाविद्या-
लय, वडुज

विद्यार्थिनीचे नाव - गोडसे पुजा रमेश

विषय - आधुनिक व्यवस्थापन प.

टकाचे नाव -

रोल नं. - 365

सन - 2016-17

Scanned with CamScanner

Topic:

Page No.____

Date: ______

घटकाचे नाव -

गाभाभूत सक्षमतेची व्याख्या

व घटक

मार्गदर्शक प्राध्यापक -

हिंगमिरे .K.J

Scanned with CamScanner

गाभाभूत सक्षमतेची व्याख्या सांगून गाभाभूत सक्षमतेचे घटक स्पष्ट करा.

भारतीय विचारवंतामध्ये सी. के. प्रल्हाद यांना मानाचे स्थान दिले जाते. त्यांनी परपरागत व्यवस्थापनाचे तंत्र कालबाह्य ठरविले. गाभाभुत सक्षमता व्यवसाय संस्थेच्या दीर्घकालीन योजनेशी संबंधित असते. स्पर्धेत टिकुन राहण्यासाठी प्रत्येक संस्थेला आपले स्थान निर्माण करावे लागते विशिष्ट प्रकारच्या वस्तू किंवा सेवा समाजाला पुरवि-ण्यासाठी व त्यातून नफा मिळविण्यासाठी व्यवसाय संस्था काम करते. ही सरसता मुलभूत सामर्थ्यातून निर्माण होते. ती गाभाभूत सक्षमता होय.

## गाभाभूत सक्षमतेची व्याख्या -

मिळविलेली व्यवसायिक ज्ञान व तांत्रिक क्षमता यांचे एकत्रिकरण करून व्यवसायाची स्पर्धा शक्ती वाढून बाजारपेठेत आपले स्थान निर्माण करून व्यवसायाची व्याप्ती वाढविण्याची व ग्राहकांना अधिकाधिक फायदा मिळवून देण्याची क्षमता म्हणजे गाभाभूत सक्षमता होय.

## * गाभाभूत सक्षमतेचे घटक -

### ① विकासासाठी सातत्य अपरिहार्य -

भविष्यकालीन नेतृत्वासाठी स्पर्धा करित असताना कंपनी नफ्यासाठी सातत्याने नव

साधनसामग्री विकसित करण्यात प्रयत्नशील असली पाहिजे. यासाठी व्यवसायातील नवीन तंत्राचा विकास व नवीन वस्तूचा विकास याच्याशी एकनिष्ठता व बांधिलकी असणे आवश्यक ठरते. व्यवसायात पुर्ण गुंतवणूकीची क्षमताही तितकीच महत्त्वाची ठरते. व्यवसायात तसेच सातत्याने नवीन गोष्टीचा विकास करणे अपेक्षित असते.

## ② सक्षमतेचा अभ्यास -

विकासासाठी कंपनीच्या सक्षमतेचा अभ्यास करणे, ही काळाची गरज आहे. ग्राहकाच्या दृष्टीकोनातून स्पर्धक कंपनीच्या दृष्टीकोनातून स्पर्धक कंपनीच्या दृष्टीकोनातून आपल्या सक्षमतेची कमाल मर्यादा ठरविणे, हा विकासाचा पाया होय. आपल्या सक्षमतेची कमाल मर्यादा ठरविणे हा विकासाचा पाया होय. आपल्या क्षमता शोधून काढून, त्यांचा अभ्यास करून त्यांचा वापर नवीन वस्तूच्या विकासासाठी केलाच पाहिजे त्याच बरोबर आपल्या क्षमतांचा वापर करून भविष्यकालीन, योजना तयार केल्या पाहिजेत की ज्या स्पर्धक कंपन्या करू शकणार नाहीत.

## ③ वरिष्ठ व्यवस्थापनाचे कार्य व दिशा -

विकासासाठी प्रामुख्याने वरिष्ठ व्यवस्थापनाने आपल्या विचाराची व धोरणाची दिशा बदलली पाहिजे. नवीन व्यवस्थापकीय तंत्राचे प्राथमिक आव्हान हे वरिष्ठ व्यवस्थापन आणि त्यांच्या कार्य करण्याच्या पद्धतील आहे. नवीन कोणता क्षमतांचा विकास संघटनेत झाला पाहिजे. नवीन क्षमता विकसित

करण्यासाठी आवश्यक असणारी परिस्थिती, वातावरण व संधी आपण उपलब्ध करून देत आहोत का या प्रश्नांची उत्तरे वरिष्ठ व्यवस्थापकाने मिळविली पाहिजे.

## ④ भूतकाळ व भविष्यकाळ -

भूतकाळातील ठराविक माहितीच्या आधारावर भविष्याच्या अंदाज करणे हे आधुनिक काळात कालबाह्य ठरणार आहे. भूतकाळात वापरलेली तत्वे, नियम, सिद्धांत आज विसरावे लागतील आणि भविष्यकाळासाठी स्वतःची नवीन तत्वे व कार्य प्रणाली शोधावी लागेल.

## ⑤ व्यवस्थापन पातळ्यांची पुर्नरचना -

आधुनिक व्यवस्थापकीय तंत्रानुसार व्यवस्थापनाच्या पातळ्या तसेच प्रशासनाच्या पातळ्या या सर्व बंद न राहता त्यातील अंतर पुसट झाले पाहिजे व त्यांची पुर्नरचना केली पाहिजे पातळ्यारहीत व्यवस्थापन ही नवीन संकल्पना आता अमलात आणली पाहिजे.

## ⑥ बदलती व्यवस्थापकीय कार्य -

यशस्वी व्यवस्थापनासाठी जी कौशल्ये मागील दोन-तीन दशकामध्ये आवश्यक मानली जात होती त्यात आता आमुलाग्र बदल झाला आहे. व्यवस्थापनासाठी नवीन पद्धती व कौशल्यांची गरज भासते.

Page No.
Date

## ⑦ विकासाच्या गामा -

विकास सोबाय्च्या असेल तर भूतकाळातील बटकापासून सुटका करून घेतली पाहिजे. स्वतःची पारंपारिक तत्वे विसरून नवीन अशा क्षमतांच्या विकास साधता आला पाहिजे. स्पर्धेमध्ये टिकून राहण्यासाठी दर्जेदार वस्तुचे उत्पादन करता आले पाहिजे - असे प्रा. प्रल्हाद यांचे प्रतिपादन आहे.

## ⑧ बदलती स्पर्धात्मक परिस्थिती -

सर्व व्यवस्थापन विचारवंतांच्या मते जागतिकीकरण, नव्या बाजारपेठेचे महत्त्व याबत चा परिणाम २१ व्या शतकातील व्यवस्थापनावर होणार आहे. त्याचबरोबर संगणकीय कारणामुळे संदेशवहनामुळे उद्योगाच्या स्पर्धात्मक परिस्थिती आमुलाग्र स्वरूपाचे बदल अपेक्षित आहेत. या सर्व बदलत्या बटकाचा परिणाम काय असेल त्याचा व्यवस्थापकीय कार्यावर कसा परिणाम होईल त्याचा विचार करणे गरजेचे आहे.

Shub